www.rajdand.com
सातारा गुरूवार
७. ३. २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाच्या मानदंड
राजदंड
स्थापना १९९९
२५ वर्षे विश्वासार्हतेची

# काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची आज बैठक

## उमेदवारांच्या नावांवर शिक्कामोर्तब होणार?



**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने गुरुवारी केंद्रीय निवडणूक समितीची बैठक बोलावली आहे. या बैठकीत काँग्रेस उमेदवारांच्या नावांची पहिली यादी निश्चित करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे हे केंद्रीय निवडणूक समितीचे अध्यक्ष आहेत. या समितीमध्ये माजी अध्यक्ष सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांचाही समावेश आहे.

काँग्रेस केंद्रीय निवडणूक समितीची पहिली बैठक ७ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे. या बैठकीत लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांच्या नावाबाबत चर्चा केली जाईल आणि निर्णय घेतला जाईल, असे काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी ट्विट केले आहे. दुसरीकडे, लोकसभा निवडणुकीसाठी पक्षाचा जाहीरनामा तयार करण्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या काँग्रेस समितीनेही मसुदा तयार केला आहे. आता काँग्रेस कार्यकारिणी यावर चर्चा करणार आहे.

जाहीरनामा समितीचे अध्यक्ष आणि माजी अर्थमंत्री पी चिदंबरम म्हणाले की,आम्ही जाहीरनाम्याचा मसुदा तयार केला आहे. आता तो काँग्रेस कार्यकारिणीसमोर मांडला जाणार आहे. समितीच्या बैठकीत याला अंतिम स्वरूप दिले जाईल. त्यानंतर हा काँग्रेस पक्षाचा जाहीरनामा बनेल. उद्या ते काँग्रेस अध्यक्षांसमोर मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रियंका गांधी रायबरेलीमधून निवडणूक लढवू शकतात

यापूर्वी मीडिया रिपोर्ट्समध्ये दावा करण्यात आला होता की, यावेळी प्रियंका गांधी रायबरेलीमधून निवडणूक लढवू शकतात. ही जागा काँग्रेसची पारंपरिक जागा आहे. सध्या सोनिया गांधी येथून लोकसभेच्या खासदार आहेत. मात्र यावेळी सोनिया राजस्थानमधून राज्यसभेत पोहोचल्या आहेत. अशा परिस्थितीत प्रियंका गांधी या जागेवरून निवडणूक लढवणार असल्याची चर्चा आहे. तर राहुल गांधी पुन्हा एकदा अमेठी आणि वायनाडमधून निवडणूक लढवू शकतात.

## अजित पवारांच्या सभेत शरद पवारांचा जयजयकार!

### दिलीप वळसेंच्या मतदारसंघात दुसऱ्यांदा प्रकार, आंबेगावचं मैदान वळसे पाटलांना जड जाणार?







पुणे: उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या सभेत शरद पवारांचा जयजयकार झाल्याचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. आंबेगाव विधानसभेतल्या मंचर या गावात सोमवारी (४ मार्च) झालेल्या अजित पवारांच्या सभेत हा प्रकार घडल्याचं स्पष्ट झालंय. नंतर इतर कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करणाऱ्या व्यक्तीला बाहेर काढलं असलं तरी दिलीप वळसे पाटलांच्या (ऊळश्रळि थरश्रीश झरींळश्र) मतदारसंघात असा प्रकार दुसऱ्यांदा घडला आहे. त्यामुळे दिलीप वळसे पाटलांना आंबेगावचं मैदान जड जाणार असल्याची जोरदार चर्चा रंगलीय.

काय आहे प्रकरण?

पुणे जिल्ह्यातील शिरूर लोकसभा मतदारसंघातील मंचर येथे ४ मार्च रोजी राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचा मेळावा पार पडला. त्यावेळी स्टेजवर जुन्नरचे आमदार अतुल बेनके बोलत असताना खालून एका व्यक्तीने शरद पवारांच्या नावाने घोषणाबाजी सुरू केली. त्यावेळी सर्वांचं लक्ष त्या व्यक्तीकडे गेलं. पण अतुल बेनके यांनी त्याकडे लक्ष देऊ नका असं सांगत लाऊड स्पीकरच्या आवाजात ही घोषणाबाजी दाबण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर बाजूच्या एका कार्यकर्त्यांने घोषणाबाजी करणाऱ्या व्यक्तीला बाजूला नेलं.

अजित पवारांच्या उपस्थितीत पार पडत असलेल्या सभेमध्ये थेट शरद पवारांच्या नावाचा जयजयकार केल्याचे दोन व्हिडीओ सध्या सोशल मीडियामध्ये व्हायरल) होत आहेत. काही जणांनी घोषणाबाजी करणारा तो व्यक्ती हा मद्यधुंद अवस्थेत असल्याचं म्हटलं. तर काहींनी त्या व्यक्तीला नंतर मारहाण करण्यात आल्याचं म्हटलंय.

दिलीप वळसेंच्या मतदारसंघात दुसऱ्यांदा प्रकार

सहकार मंत्री दिलीप वळसे पाटलांच्या आंबेगाव विधानसभेत असा प्रकार दुसऱ्यांदा घडला. या आधीही दिलीप वळसेंना शरद पवारांच्या समर्थकांच्या रोषाला सामोरं जावं लागलं होतं.

शिरूर तालुक्यातील पाबळ गावात बैलगाडा शर्यतीवेळी तो प्रसंग घडला होता. वळसे पाटील हे त्या ठिकाणच्या पाणी प्रश्नाबाबत बोलत असताना, खालून शरद पवारांच्या नावाचा जयघोष झाला. त्यावेळी दिलीप वळसेंवर आपलं भाषण आटोपतं घेण्याची वेळ आली होती.

वळसे पाटलांचा वार जिव्हारी, त्यांना पाडण्याचं शरद पवारांचं आवाहन

शरद पवारांनी दिलीप वळसे पाटलांच्या मंचरमध्ये सभा घेतली आणि त्यांना पाडण्याचं आवाहन केलं होतं.

ज्या व्यक्तीला आपण सर्व काही दिलं त्या व्यक्तीने आपल्याला फसवलं असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली होती. त्यानंतर शरद पवार गटाचे कार्यकर्ते आक्रमक झाल्याचं दिसून आलंय. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर दिलीप वळसे पाटील हे अजित पवारांसोबत गेले. सर्वजण गेले तरी दिलीप वळसे शरद पवारांची साथ सोडणार नाहीत असं म्हटलं जायचं. पण वळसे पाटलांच्या निर्णयामुळे खुद्द शरद पवारांसह अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. त्यामुळेच दिलीप वळसेंच्या मतदारसंघात सभा घेऊन शरद पवारांनी त्यांना पराभूत करण्याचं आवाहन तिथल्या मतदारांना केलं होतं.

## केजरीवालांच्या अडचणीत वाढ

**दिल्ली :** दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अंमलबजावणी संचालनालयाने मनी लॉन्ड्रिंगच्या प्रकरणात अनेकदा चौकशीसाठी समन्स बजावूनही ते हजर राहिले नाही. आता अखेर समन्सचे पालन न केल्याबद्दल ईडीने कोर्टाचा दरवाजा ठोठावला आहे. ईडीने केजरीवालांविरोधात खटला चालवण्याची मागणी करणारी नवी तक्रार न्यायालयात दाखल केली आहे.

लूसमन्स बजावूनही केजरीवाल हजर झाले नाहीत. अतिरिक्त मुख्य मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट दिव्या मल्होत्रा यांनी गुरुवारी या प्रकरणाची सुनावणी ठेवली आहे. दिल्ली उत्पादन शुल्क धोरणाशी संबंधित मनी लाँड्रिंग चौकशीत केजरीवालांना जारी करण्यात आलेल्या पहिल्या तीन समन्सवर हजर न राहिल्याबद्दल ईडीने यापूर्वी स्थानिक न्यायालयात केजरीवालांविरुद्ध खटला चालवण्याची याचिका दाखल केली होती.



## कमळावर लढणार की धनुष्यबाणावर?

### श्रीरंग बारणेंनी ठामपणे सांगून टाकलं

**पुणे :** मावळ लोकसभेत महायुतीचा उमेदवार कोणत्या पक्षाचा असेल यावरून तर्कवितर्क लढवले जातायेत, असं असतानाच शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणेंनी मी महायुतीचा उमेदवार असेल, असं ठामपणे म्हटलंय. पण कमळावर लढणार की धनुष्यबाणावर? असं विचारल्यावर 'मी महायुतीचा उमेदवार असेल' असं म्हणत बारणेंनी संदिग्धता कायम ठेवली आहे. बारणेंच्या उमेदवारीला अजित पवारांच्या राष्ट्रवादीने आणि भाजपने ही विरोध दर्शविला आहे.

पिंपरी भाजपने कमळावरचा उमेदवार असायला हवा, मग बारणे असले तरी आमची हरकत नाही, अशी भूमिका घेतली होती. त्यालाच अनुषंगाने बारणे भाजपचे उमेदवार असतील, अशी चर्चा मावळ लोकसभेत सुरू होती. अशातच मी महायुतीचा उमेदवार असेन, असं म्हणत बारणेंनी आणखी संदिग्धता वाढवली आहे. तर ज्या उमेदवाराचा मतदारसंघात थांगपत्ता नाही, त्या उमेद्वाराबद्दल मी बोलणार नाही. असं म्हणत महाविकासआघाडीचे उमेदवार संजोग वाघेरेंची खिल्ली उडवली.

मावळमधील महायुतीचा उमेदवार कोण असेल असं विचारल्यावर श्रीरंग बारणे ठामपणे म्हणाले की, मावळ लोकसभेचा महायुतीचा उमेदवार मीच असेल. महायुतीकडून भाजप, शिवसेनेसोबत सहभागी झालेले राष्ट्रवादी काँग्रेसपक्षाचे अजित पवार या महायुतीच्या घटकपक्षांचा उमेदवार काही दिवसातच स्पष्ट होईल. त्यात महायुतीचा उमेदवार मीच असेल.

**संजोग वाघेरेंची खिल्ली उडवली!**

उबाठाने मावळमधील उमेदवारी जाहीर केला आहे. संजोग वाघेरे यांच्या नावाची घोषणा केली आहे. ते म्हणाले की माझी लढत थेट भाजपसोबत असेल मात्र यावरच आता श्रीरंग बारणेंनी सडेतोड उत्तर दिलं आहे. बारणे म्हणाले की, ज्या उमेदवाराचा मला थानपत्ता नाही त्या उमेदवारासंदर्भात मी काहीही बोलू इच्छित नाही. मावळमधून भाजपच्या चिन्हावर उमेदवारी मिळाली तर लढणार का?, असं विचारल्यास बारणे म्हणाले, की या संदर्भात कोणतंही वक्तव्य करणं उचित ठरणार नाही. मात्र श्रीरंग बारणेच उमेदवार असणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

## साताऱ्यात इंडिया आघाडीचा खल

### पवारांची जानकरांना साद; माढाच्या लढतीत आणखी एक सिंह उतरल्याने चुरस वाढली!





**सातारा :** राज्यातील सत्ताधारी महायुतीमध्ये छोट्या घटक पक्षांची घुसमट होत असतानाच राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांनी भाजप विरोधात उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे.

ते गेल्या काही दिवसांपासून महायुतीवर नाराज असल्याची चर्चा सुरू असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी महादेव जानकर यांना थेट साद घालत त्यांच्या कोट्यातील माढा लोकसभेची जागा सोडण्याची तयारी दर्शवली आहे.

**जानकर कोणता निर्णय घेणार?**

त्यामुळे महादेव जानकर कोणता निर्णय घेणार? अशी चर्चा रंगली आहे. दरम्यान, महादेव जानकर यांनी शरद पवार यांनी माढा लोकसभेची जागा सोडण्याची तयारी दर्शवल्यानंतर स्वागत केलं होतं. मात्र, त्यांनी शिवसेना ठाकरे गट, काँग्रेस आम्हाला कोणती जागा सोडणार? अशी विचारणा केली होती.

शरद पवारांचा माढा लोकसभा मतदारसंघ पुन्हा एकदा जिंकण्यासाठी शरद पवार गटाकडून मोठी तयारी सुरु आहे. सध्या या मतदारसंघाचे नेतृत्व भाजपचे रणजितसिंह निंबाळकर करतात. मात्र, निंबाळकरांविरोधात पक्षांतर्गत नाराजीचा विरोध वाढत चालल्याची चर्चा आहे. धैर्यशील मोहिते पाटील यांनी सुद्धा मतदारसंघ पिंजून काढण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे ही माढाची जागा शरद पवार गटाकडून लढली जाणार की महादेव जानकर शरद पवारांच्या विनंतीला मान देत रिंगणात उतरणार याची चर्चा आहे.

दरम्यान, सातार लोकसभेला महायुतीकडून उदयनराजे भोसले रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. भाजपच्या संभाव्य यादीत उदयनराजे भोसले आहेत. उदयनराजे भोसले सध्या राज्यसभेवर आहेत. दरम्यान, त्यांच्याविरोधात राष्ट्रवादीकडून श्रीनिवास पाटील हेच रिंगणात असण्याची शक्यता आहे.

**अभयसिंह जगताप राष्ट्रवादीकडून इच्छूक**

दरम्यान महादेव जानकरांसाठी शरद पवार आग्रही असतानाच शरद पवार गटातून अभयसिंह जगताप हे सुद्धा माढा लोकसभेसाठी इच्छुक आहेत. जगताप यांनी आज शरद पवार यांची भेट घेत माढा लोकसभा मतदारसंघासाठी इच्छुक असल्याचे म्हटलं आहे. दरम्यान, शरद पवार यांनी महादेव जानकर यांना घातलेली साद माहीत असली, तरी जानकर महाविकास आघाडीकडून उभारण्यास इच्छुक नसतील, तर माझ्या उमेदवारीचा विचार व्हावा असे मी शरद पवारांना सांगितल्याचे जगताप यांनी म्हटले आहे. माढा लोकसभा मतदारसंघातील सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये मी फिरलो असून याची माहिती शरद पवारांना दिली. पदाधिकारी सोबत असून आम्ही चर्चा केली आहे. त्यामुळे योग्य तो निर्णय शरद पवार घेतील असं त्यांनी म्हटले आहे.

**कोण आहेत अभयसिंह जगताप?**

दुसरीकडे, काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अभयसिंह जगताप यांच्या उमेदवारीचे सुतवाच केले होते. जगताप सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील म्हसवडचे आहेत. ते पेशाने व्यावसायिक असून गेल्या गेल्या काही वर्षांपासून ते शरद पवार गटांमध्ये सक्रिय आहेत. जयंत पाटील यांनी त्यांच्या कामाचा अनेकवेळा कौतुक केलं आहे.




## भाजपकडून शिंदे गट आणि अजितदादा गटाला सिंगल डिजिट जागा

**मुंबई:** महायुतीच्या लोकसभा जागावाटपात भाजप स्वत:च्या वाट्याला ३२ जागा ठेवून उर्वरित १६ जागांमध्ये शिंदे गट आणि अजितदादा गटाची बोळवण करेल, अशी जोरदार चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरु आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत मंगळवारी आणि बुधवारी मुंबईत महायुतीच्या जागावाटपाबाबत चर्चा झाली. यावेळी अमित शाहयांनी जिंकून येणे हा एकमेव निकष ग्राह्य धरत महाराष्ट्रातील लोकसभेच्या ३२ जागा भाजप लढवेल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अमित शाह यांना सांगितल्याचे समजते. त्यामुळे उर्वरित १६ जागांचे समसमान वाटप करायचे झाल्यास शिंदे गट आणि राष्ट्रवादीच्या वाट्याला प्रत्येकी ८ म्हणजे सिंगल डिजिट जागा येतील. तसे प्रत्यक्षात घडल्यास ही एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासाठी राजकीय नामुष्की ठरेल. त्यामुळे या गोष्टीची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरु आहे. या पार्श्वभूमीवर भाजपचे राज्यातील एक नंबरचे नेते देवेंद्र फडणवीस (ऊर्शींशपवीर ऋवपरींळी) यांनी एक महत्त्वाचे स्पष्टीकरण दिले आहे.

देवेंद्र फडणवीस आणि राज्य भाजपच्या कोअर कमिटीचे सदस्य सध्या दिल्लीत गेले आहेत. यावेळी प्रसारमाध्यमांनी देवेंद्र फडणवीस यांना शिंदे गट आणि अजितदादा गटाला लोकसभेला भाजप १० पेक्षाही कमी जागा देणार का, असा प्रश्न विचारला. त्यावर देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, शिंदे गट आणि अजितदादा गटाला सिंगल डिजिट जागा मिळणार, ही केवळ पतंगबाजी आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीला इतक्याच जागा मिळणार, अशी चर्चा होणे अयोग्य आहे.

**पाहिजेत**

राजदंड

२५ वर्ष सातत्याने प्रसिद्ध होणाऱ्या दै राजदंडसाठी पश्चिम महाराष्ट्रात तालुका व जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहे. आपल्या परिसराची भौगोलिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक जाण असलेल्या, मराठी भाषेवर प्रभुत्व असलेल्या आणि जनसंपर्क असलेल्या उमेदवारांनी संपर्क साधावा. उमेदवार पदवीधर असावा. पत्रकारिता व जनसंपर्क विषयात प्रशिक्षण घेतलेल्या व माध्यम क्षेत्रात किमान अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य

संपर्क: rajdand.pune@gmail.com



# गरीब महिला शेतकऱ्यांना ४०० गायींचे वितरण

### 'रोटरी क्लब ऑफ पूना नॉर्थ'चा उपक्रम

**पुणे :** 'रोटरी क्लब ऑफ पूना नॉर्थ' तर्फे पुणे जिल्हयातील ग्रामीण भागात कार्यरत ४०० गरीब महिला शेतकऱ्यांना ४०० गायी देण्यात आल्या.रोटरी क्लब ऑफ पूना नॉर्थचे माजी अध्यक्ष कुमार शिनगारे यांनी ही माहिती पत्रकाद्वारे दिली. खेड, मुळशी, मावळ,हवेली,जुन्नर,पारनेर भागातील गरजू महिला शेतकऱ्यांचा शोध घेऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी हा उपक्रम करण्यात आला. त्यासाठी १ कोटी साठ लाखांचा निधी उभारण्यात आला.निधी उभारणीत रोटरी क्लब ऑफ पूना नॉर्थसह पुणे जिल्ह्यातील ४० रोटरी क्लब,तैवानच्या रोटरी क्लब यांनी पुढाकार घेतला.या महिला शेतकऱ्यांना होल्स्टन,गीर आणि देशी गायी देण्यात आल्या.एका गायीसाठी प्रत्येकी ४० हजार रुपये खर्च करण्यात आले.

२००५ पासून रोटरी क्लब ऑफ पूना नॉर्थ हा उपक्रम करीत असून आतापर्यंत १८०० गायी शेतकऱ्यांना देण्यात आल्या आहेत.त्यातून वीण होत पुढे गायींची संख्या ४० हजार आणि बैलांची संख्या २० हजारांवर पोचली आहे.२०० हुन अधिक दूध संकलन केंद्रांवर गायीचे दूध पोचत आहे.शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न एका गायीमागे,दरमहा ८ हजाराने वाढले आहे.या उपक्रमासाठी रोटरीच्या ग्लोबल ग्रँटची मदत घेण्यात आली आहे.नेदरलँड,अमेरिका,तैवान येथील रोटरी क्लबची मदत घेण्यात आली.डेव्हलपमेंट इनिशिएटिव्ह फॉर सेल्फ हेल्प अँड अवेकनिंग(दिशा) या संस्थेचे मार्गदर्शन घेण्यात आले.

# योग्यवेळी जागांची आणि उमेदवारांचीही घोषणा होईल : माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण

**सातारा :** भाजप आणि मनुवादी व्यवस्थेच्या विरोधात एकत्र आलो असून महाराष्ट्रात विजयाची खात्री नसल्यानेच त्यांच्याकडून फोडाफोडीचे राजकारण सुरू आहे. त्यामुळे तीन पक्षांच्या बैठकीत उमेदवार ठरेल त्याला विजयी करणार आहे. यासाठी योग्यवेळी जागांची आणि उमेदवारांचीही घोषणा होईल, अशी माहिती माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी दिली.

सातारा येथील काँग्रेस कमिटीत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. महाविकास आघाडीतील घटक पक्ष आणि विविध संघटनांच्या बैठकीनंतर पत्रकार परिषद झाली. यावेळी खासदार श्रीनिवास पाटील, माजी मंत्री बाळासाहेब पाटील, शशिकांत शिंदे, सतेज पाटील, शिवसेना ठाकरे गटाचे उपनेते प्रा. नितीन बानुगडे-पाटील, श्रमिक मुक्ती दलाचे डॉ. भारत पाटणकर, लक्ष्मण माने, अ‍ॅड. वर्षा देशपांडे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. सुरेश जाधव, सरचिटणीस नरेश देसाई, काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्षा अल्पना यादव, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सरचिटणीस राजकुमार पाटील, उदयसिंह पाटील, रणजितसिंह देशमुख आदी उपस्थित होते.




माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, आताच्या लोकसभा निवडणुकीत भाजपने ३७० पार खासदाराचा नारा दिला आहे. याचा अर्थ संविधान बदलण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्याचबरोबर लोकशाही संपुष्टात आणून विरोधी पक्षांनाही संपविण्याचे काम सुरू आहे. महाराष्ट्रात तर मराठा समाज आणि ओबीसीत भांडणे लावली आहेत. हे सर्व मनुवादी कारस्थान आहे. या निवडणुकीत विजयाची खात्री नसल्यानेच त्यांच्याकडून पक्ष फोडण्याचे काम सुरू आहे. देशातील लोकशाही आणि संविधान टिकवण्यासाठी लोकांनीच ही निवडणूक हाती घेण्याची गरज आहे. त्याचबरोबर या निवडणुकीत वंचित आघाडीलाही बरोबर घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

माजी मंत्री शशिकांत शिंदे म्हणाले, ३ फेब्रुवारीला महाविकास आघाडीची बैठक राष्ट्रवादी भवनमध्ये झाली. त्यानंतर काँग्रेस कमिटीत ही बैठक पार पडली. इंडिया आघाडी मजबूत असून सर्वांत भाजपविरोधात लढण्याची जिद्द आहे. महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांचा वारसा आणि त्यांचे विचार बदलण्याचा प्रयत्न होत आहे. पण, आम्ही तसे होऊ देणार नाही. यशवंतराव चव्हाण यांचे विचार जीवंत ठेवण्याची भूमिका आम्ही घेतली आहे. यासाठीच ही बैठक झाली. साताऱ्यात ३८ पक्ष आणि संघटना एकत्र आल्या असून आम्ही आता विजयी होऊनच दाखवू.

**८ मार्चला कऱ्हाडला बैठक**

**महाविकास आघाडीतील पक्ष आणि प्रमुख संघटनांची पुढील बैठक दि. ८ मार्चला कऱ्हाडला घेण्यात येणार आहे. या बैठकीत निवडणुकीची पुढील रणनिती ठरविण्यात येणार आहे. तसेच आघाडीतील प्रमुख तीन पक्षाची बैठक मुंबईत होत आहे. यामध्ये राज्यातील जागा वाटपावर अंतिम चर्चा होईल, असेही या पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.**

प्रा. बानुगडे पाटील यांनीही भाजपवर तोंडसुख घेतले. तसेच २०२४ ची निवडणूक भारताची दिशा ठरवणारी आणि संविधान वाचविणारी आहे. ही निवडणूक स्वातंत्र्यांची दुसरी लढाई आहे. यासाठी आम्ही सर्वजण एकत्र निवडणूक लढवतोय, असेही त्यांनी स्पष्ट केले. तर डॉ. पाटणकर यांनी जातीयवादी शक्ती आणि हुकुमशाही आणणाऱ्याविरोधात आम्ही एकत्र आलो आहोत, असे सांगितले.

लोकसभेची निवडणूक चार मुद्यांवर

आताची लोकसभा निवडणूक ही चार मुद्यांवर लढणार आहे. महागाई, शेतकरी प्रश्न, बेरोजगारी आणि भ्रष्टाचार हे प्रमुख चार मुद्दे असतील, असेही माजी मुख्यमंत्री चव्हाण यांनी या पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

## पाणलिंग पालखी कावड यात्रा ८ ते १० मार्चला

**वावरहिरे -** येथील ग्रामदैवत श्री पानलिंग पालखी कावड यात्रा ( महाशिवरात्री ) दि. ८ते १० मार्च रोजी आहे.

या यात्रेनिमित्त महिलांसाठी होम मिनिस्टर कार्यक्रम गुरुवार दि. ७मार्च २०२४ सायंकाळी ६.०० वाजता जि.प. प्राथमिक केंद्र शाळा येथे आयोजिक करण्यात आला आहे. जागतिक महिला दिनानिमित्त अंजनी महिला पतसंस्था वावरहिरे यांचेवतीने शिवशक्तींचा सन्मान तसेच ८ मार्च रोजी भास्करराव पेरे पाटील यांचे व्याख्यान शनिवार दि. ९मार्च रोजी सायंकाळी ०६.३० वाजता महाप्रसाद ठेवण्यात आला आहे.

रविवार दि.१० मार्च ला गावात श्री च्या पालखी व मानाची कावड यांचे जंगी स्वागत करुन पेढे वाटप करण्यात येते. तसेच यात्रेदरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# वळती शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**वळती :** वळती (ता. आंबेगाव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा , नरसिंह विद्यालय भागशाळा , वळती तसेच अंगणवाडीतील विद्यार्थ्यांचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. यामध्ये विद्यार्थ्यांनी बालगीते, लोकनृत्य, कोळीगीते, हिंदी-मराठी गाणी सादर केले, अशी माहिती मुख्याध्यापक विलास डोळस यांनी दिली.

स्नेहसंमेलनचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते धोंडीभाऊ भोर यांचे हस्ते झाले. या वेळी सरपंच आनंद वाव्हळ , उपसरपंच तेजस भोर , अनिता भोर , शिवाजी लोखंडे , बारकु बेनके , रविंद्र भोर , सुजित लोंढे, बाबाजी भोर , महेश भोर , योगिता लोंढे , पुष्पा लोखंडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जयेंद्र भोर, उपाध्यक्ष सारीका लोंढे , अश्विनी भोर , विविध संस्थांचे पदाधिकारी, पोलिस पाटील प्रकाश लोंढे, ग्रामस्थ, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.



या स्नेहसंमेलनामध्ये वळती येथील जिल्हापरिषद शाळा , नरसिंह विद्यालय भागशाळा वळती तसेच अंगणवाडीतील विद्यार्थ्यांर्थ्यांनी सहभाग घेतला .

यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी गजानन पुरी , केंद्रप्रमुख साहेबराव शिंदे यांनी भेट दिली .

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना टाळ्या, शिट्या वाजवून तसेच रोख बक्षिसे देत उपस्थितांनी दाद दिली. सूत्रसंचालन अशोक मावळे , भारती मुळे यांनी केले, तर जयेंद्र भोर यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक विलास डोळस व सहकारी शिक्षक यांनी केले.

# अहिल्या आश्रमचे किल्लेदार एम.डी शेवाळे सर यांना डिसीएम सोसायटी ऑफ इंडियाकडून अभिवादन



**हडपसर /पुणे :** आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते,डीसीएम सोसायटीचे जनरल सेक्रेटरी,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(-)चे राष्ट्रीय कोषाध्यक्ष, पुरोगामी चळवळीचे मार्गदर्शक, शिक्षण महर्षी, अहिल्या आश्रमचे किल्लेदार एम.डी शेवाळे सर यांच्या जयंतीच्या निमित्ताने डिसीएम सोसायटी कॉलेज आवारातील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.५ डीसीएम सोसायटी ऑफ इंडिया पुणे चे माजी मा.जनरल सेक्रेटरी दिवंगत एम.डी शेवाळे सर यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या अहिल्या आश्रम परिसरात असलेल्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डी.टी रजपूत ,जनरल सेक्रेटरी विशाल शेवाळे , खजिनदार सिद्धार्थ शेवाळे, सुष्मिता शेवाळे ,संस्था प्रतिनिधी काजल शेवाळे ,यश शेवाळे ,वर्षा पाटील ,नितीन पाटील,वरूण भोसले,मुख्याध्यापिका शिल्पा भोसले ,मुख्याध्यापिका सुनीता भोसरेकर,मुख्याध्यापक धर्मेंद्र देशमुख,प्राचार्य डॉ.भारती सहस्त्रबुद्धे,उपप्राचार्य डॉ. नरेश पोटे, डॉ.जे.के म्हसके,किशोर भुजबळ, विलास गायकवाड संस्थेतील सर्व शिक्षक,प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी. महेंद्र कांबळे , शैलेंद्र चव्हाण,जगताप, रोहिदास गायकवाड, निलेश आल्हाट, संदीप धांडोरे,सुनील खुडे,संघमित्रा गायकवाड,शोभा झेंडे, दादाभाऊ वारभुवन,भगवान गायकवाड व रिपाइं उपस्थित होते.सर्वांच्या वतीने एम.डी शेवाळे स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले.

या अभिवादन प्रसंगी त्यांची कन्या मुख्याध्यापिका शिल्पा भोसले यांनी शेवाळे यांनी केलेल्या शैक्षणिक,सामाजिक,राजकीय, संस्थे विषयीच्या कार्याला उजाळा दिला.संस्थेतील, जीवनातील अनेक आठवणी सांगितल्या

संस्थेचे जनरल सेक्रेटरी विशाल शेवाळे सांगितले की माझ्या वडिलांचे संपूर्ण कार्य हे आजही आपल्याला प्रेरणादायी आहे शेवाळे साहेबांचा सामाजिक विचार आपण प्रत्येकाने पुढे नेला पाहिजे आज त्यांची आपल्याला त्यांच्या विचारांची गरज होत आहे डीसीएम संस्थेच्या व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या माध्यमातून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर स्वतः ची ओळख निर्माण केली होती.

आंबेडकरी चळवळीला सदैव मदत केली असल्याचे सांगण्यात आले.

डीसीएम संस्थेचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष डी टी रजपूत आपले मनोगत व्यक्त करताना शालेय, महाविद्यालयीन,कौटुंबिक जीवनातील अनुभव सांगितले व संस्थेचा सर्व इतिहास सांगितला ही संस्था मोठी करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. निस्वार्थीपणे त्यांनी शैक्षणिक कार्य केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मदने मॅडम यांनी केले तर आभार प्राध्यापक मधुकर धीवार यांनी मांडले.

# सोनाक्षी सिन्हा आणि सृष्टी राय यांचा 'सोइझी' ब्रँड पुण्यात दाखल

### हडपसर सिझन मॉल मध्ये सिने अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा यांच्या हस्ते सोइझी नेल ब्रँड शॉपचे उद्घाटन

**हडपसर :** हडपसर मधील सिझन मॉल मध्ये सिने अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा व सृष्टी रॉय यांच्या भागीदारीत सोइझी ब्रँड चे उद्घाटन करण्यात आले.

२ मार्च २०२४ - सोनाक्षी सिन्हा आणि सृष्टी राय यांनी परस्पर सहकार्याने सुरू केलेल्या सोइझी' या 'प्रेस-ऑन नेल' बँडचे शो रूम पुण्यात आजपासून खुले झाले पुण्यासारख्या गजबजलेल्या शहरात आपले ब्रँड सुरू करण्याचा आपले हे पहिले ऑफलाइन रिटेल आऊटलेट सुरु करण्याचा अभिमान आहे. नेल ग्लॅम च्या जगात 'सोइझी' ने आणलेला हा सुविधा आणि शैली यांचा अनोखा संयोग साजरा करण्यासाठी एक विशेष समारंभ आयो हा सुविधाधात आला. या समारंभात रुपाली हसीजा, आशना भगवानी आणि शौर्य सनाढ्य यांसारखे नामवंत प्रभावकार उपस्थित होते.

'सोइझी' ची नाविन्यपूर्ण उत्पादने या समारंभात प्रदर्शित करण्यात आली. या उत्पादनांविषयी परस्परसंवादी अनुभव यावेळी मांडण्यात आले. व्यावसायिक नेल आर्टिस्ट्सनी अतिशय कौशल्याने सादर केलेले सोइझीच्या प्रिमियम 'प्रेस-ऑन नेल्स'चे थेट प्रात्यक्षिक यावेळी उपस्थितांना दाखविण्यात आले. येथील कियॉस्कचे उत्कंठामय वातावरण आणि आकर्षक डिस्प्ले यांतून 'सोइझी' ची रंगीबेरंगी आणि वेगवेगळ्या डिझाइनधील नेल टिप्सची विस्तृत श्रेणी उपस्थितांसमोर उलगडली जात होती. इतकेच नव्हे, तर 'सोइझी'तर्फे यावेळी एक मजेदार ट्रिव्हिया चॅलेंज सादर करण्यात आले आणि अतिथींनाही त्यामध्ये सहभागी होण्याची संधी देण्यात आली. 'सोइझी'चे खास डिझाईन असलेले, गुलाबी रंगाची पार्श्वभूमी असलेले बूथ हे तर अतिथींमध्ये मोठेच आकर्षणाचे केंद्र बनले. अनेकांनी तिथे सेल्फी घेत आपला आनंद इतरांशी शेअर केला.




सोनाक्षी आणि सृष्टी यांनी मोठ्या उत्साहात आपल्या या नव्या ब्रॅण्डची माहिती सांगत आमच्या या व्यवसायाची प्रगती ऑनलाईन स्वरुपात मोठ्या प्रमाणात होत आहे आणि आता आमच्या ऑफलाइन प्रवासाला सुरुवात झाली आहे. आमचा प्रोडक्ट्स लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांना आवडेल अशा विविध रंगात रिसर्च करुन कुठलाही साईड इफेक्ट न करता वाजवी किंमतीत ७९९ ते १५९९ पासून नेल सेटची प्राइज असून सोइझी ब्रँड मार्केट मध्ये लॉन्च केलेला आहे.आम्ही खूप उत्साहित आहोत. आमच्या उत्पादनांचा अनुभव घेण्यासाठी उत्सुक असलेले नवीन ग्राहक आता या स्टोअरमध्ये थेट येतील आणि त्यांच्याशी संवाद साधण्याचा एक चांगला अनुभव आम्हालाही मिळेल. बाजारपेठेत आक्रमकरित्या प्रवेश करण्याच्या आमच्या धोरणाची ही सुरूवात आहे. या प्रकारचे कियॉस्क देशभरात उभारण्याचे आमचे उद्दिष्ट आहे, असे सोनाक्षी सिन्हा म्हणाल्या.

'सोइझी' ने रिटेल स्टोअरमध्ये मांडण्याच्या दृष्टीने काही खास, अनोखी कलेक्शन्स सादर करण्याचा, त्याचबरोबर, भविष्यात व्हर्चुअल ट्राय-ऑन आणि नाविन्यपूर्ण भागीदारी करण्याचेही नियोजन केले आहे.

अगणित रंगछटा व अनोखे डिझाईन अशी वैशिष्ट्ये असलेला, सर्व नेल बेड्सवर सुरळीतपणे बसू शकेल असा, सार्वत्रिक आकाराचा २४ नेल टिप्सचा अद्वितीय संच किऑस्कच्या माध्यमातून आता 'सोइझी'च्या ग्राहकांना सहजपणे उपलब्ध होणार आहे. 'इझी डूइट-यूअरसेल्फ' पद्धतीने नखांवर नेल टिप्स लावण्याची व काढण्याची प्रक्रिया ग्राहकांना अगदी सहजतेने जमेल आणि सुंदर नखांचा आनंद त्यांना घेता येईल; त्यांचा वेळ आणि पैसा दोन्हीची बचत साध्य होईल,सुंदर अशा सोइझी वैशिष्ट्यपूर्ण शैलीची कायमची छाप ग्राहकांवर पडेल असे सोइझी ब्रँड उद्घाटन करताना सोनाक्षी सिन्हा व सृष्टी रॉय यांनी सांगितले.

## बाळासाहेब थोरातांचा राजकीय वारसदार ठरला; लेकीची महत्त्वाच्या पदावर वर्णी

**अहमदनगर :** राजकीय नेत्यांच्या मुलांचा राजकारणात होणारा प्रवेश ही नवी गोष्ट नाही. मुलांसोबतच आता राजकीय नेत्यांची मुलीही आपल्या पित्याचा राजकीय वारसा पुढे नेण्यासाठी मैदानात उतरत असल्याचं चित्र अलीकडच्या काळात दिसून येत आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि आमदार बाळासाहेब थोरात यांची कन्याही आता राजकारणात सक्रीय होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे.

कारण जयश्री थोरात यांची आज संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

बाळासाहेब थोरात हे काँग्रेसचे निष्ठावंत नेते म्हणून ओळखले जातात. त्यांचे वडील भाऊसाहेब थोरात हेदेखील काँग्रेसमध्ये होते. थोरात कुटुंबाचं संगमनेर विधानसभा मतदारसंघावर गेल्या अनेक दशकांपासून एकहाती वर्चस्व राहिलं आहे. याच मतदारसंघातून बाळासाहेब थोरात हे सलग तब्बल आठ वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. काँग्रेसच्या सत्ताकाळात महत्त्वाच्या मंत्रिपदांची जबाबदारी सांभाळलेले थोरात हे राज्य पातळीवर मोठ्या प्रमाणात सक्रिय असतात. अशा स्थितीत त्यांनी आपली कन्या जयश्री थोरात यांना तालुका स्तरावर सक्रिय करण्याचा निर्णय घेतल्याचं दिसत आहे.

जयश्री थोरात या मागील काही काळापासून सोशल मीडियावरही राजकीय घडामोडींवर व्यक्त होत असतात. आता त्यांची संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर त्यांच्याकडे बाळासाहेब थोरात यांच्या राजकीय वारसदार म्हणून पाहिलं जात आहे. आगामी काळात त्या संगमनेरमधून विधानसभा निवडणूक लढवण्याची शक्यताही वर्तवली जात आहे.

# सातारा कारागृहात कैद्यांना आयुष्यमान भारत कार्ड वितरीत

**सातारा :** भारत देशात प्रथमच महाराष्ट्र राज्याच्या कारागृह विभागाचे अपर पोलीस महासंचालक श्री अमिताभ गुप्ता, विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. जालिंदर सुपेकर, कारागृह उपमहानिरीक्षक स्वाती साठे यांच्या मार्गदर्शनाने महाराष्ट्रातील सातारा जिल्हा कारागृहात कैद्यांना आयुष्यमान कार्ड वितरित करण्यात आले.राज्यात व देशात सर्वप्रथम कारागृहातील बंदी व कैद्यांचे आयुष्यमान भारत कार्ड व ई-श्रम कार्ड काढण्याचा नाविन्यपूर्ण उपक्रम केला आहे. अशी माहिती सातारा जिल्हा मध्यवर्ती कारागृह अधीक्षक शामकांत चं. शेडगे यांनी दिली आहे.

समता फाउंडेशन, मुंबईचे अध्यक्ष श्री अगरवाल यांच्याशी सातारा कारागृहाचे अधीक्षकांनी संपर्क साधला. समता फाउंडेशन यांच्याकडून महाराष्ट्रातील कारागृहांमध्ये कारागृहातील बंदी व कैदी यांचे प्रत्येक महिन्याला त्वचारोग शिबिर व नेत्र शिबिर घेतले जाते. याचबरोबर त्या संबंधातील आजारांवर औषध उपचार करून विनामूल्य औषधे व चष्मे देखील मोफत वाटप केल्या जातात. या अमूल्य कामगिरीबद्दल त्यांचे आभार अध्यक्ष अगरवाल यांना आभार मानले.कारागृहात असणाऱ्या बंदी व कैदी यांचे आयुष्यमान भारत कार्ड व ई श्रम कार्ड काढण्याचा उपक्रम हाती घेऊन एका नवीन उपक्रमास सुरुवात करू शकतो. यावर चर्चा केली. श्री अगरवाल यांनी सातारा जिल्हा कारागृहातील बंदी व कैदी यांचे आयुष्यमान भारत कार्ड व ई-श्रम कार्ड काढण्यास संमती देवून प्रतिनिधी श्री आदित्य उखळकर आणि श्री विश्र्वाजीत बागल यांच्याकडून कार्यवाही केली.

सातारा कारागृहात १८ महिला अंडरट्रायल कैद्यांसह सुमारे ३५० कैदी बंद आहेत. त्यांना आयुष्मान भारत कार्ड देण्यात यावे, यासाठी कारागृह अधीक्षक शामकांत शेडगे यांनी पुढाकार घेतला आहे. हे कार्ड मिळवण्यासाठी रेशन कार्ड आणि आधार कार्ड असणे आवश्यक आहे. आतापर्यंत कारागृहातील एकूण ६५ जणांचे आयुष्यमान कार्ड काढून झाले आहे.

महिन्याला अनेक कैदी कारागृह मध्ये ये -जा करतात. राज्य सरकारच्या कारागृहात असल्याने कारागृहातील कैद्यांचा वैद्यकीय खर्च सरकारकडून केला जातो. उपक्रम राज्यातील कारागृहांतील पहिलाच उपक्रम आहे. तसेच हा उपक्रम राज्यभरातील इतर कारागृहांतही राबविला जाणार असल्याची माहिती देण्यात आली. कारागृहात आलेले बहुतेक कैदी गरीब असतात . कैद्यांना आयुष्मान भारत कार्ड प्रदान केल्यामुळे जामीन मिळवून किंवा शिक्षा भोगून तुरुंगाबाहेर गेल्यावरही वैद्यकीय लाभ मिळू शकेल.

सदर उपक्रमास कारागृह सुरक्षेची काळजी घेवून ज्ञानेश्वर दुबे ,वरिष्ठ तुरुंग अधिकारी, राजेंद्र भापकर, तुरुंग अधिकारी, महेंद्र सोनवणे, सुभेदार मानसिंग बागल, सुभेदार भिसे ,सुभेदार, दारकु पारधी हवालदार, राजेंद्र शिंदे हवालदार, बर्डे हवालदार, नामदेव खोत हवालदार, दिलीप बोडरे हवालदार तसेच शिपाई प्रतीक्षा पवार, अंकिता करपे, रेश्मा गायकवाड, रूपाली नलवडे, अहमद सन्दे रणजित बर्गे, ज्ञानेश्वर गायकवाड, राहुल दळे, चेतन शहाणे, बालाजी मुंडे यांनी कामकाज पाहिले.

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२१, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६१०१०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# संविधानाचे रक्षण करणे हाच आमचा जाहीरनामा : पृथ्वीराज चव्हाण

## इंडिया आघाडी व समविचारी संघटनांची बैठक साताऱ्यात संपन्न




**सातारा :** देशातील भाजप , आरएसएस आणि मनुवाद्यांच्या विरोधात एकत्र येण्याचा निर्धार इंडिया आघाडीने केलेला आहे आणि त्याच धर्तीवर जिल्ह्याजिल्ह्यात कृती कार्यक्रम ठरवले जातील. आमचा जाहीरनामा हा संविधान व संविधानातील उद्दिष्टे हाच आहे. आणि त्या उद्दिष्टांचे रक्षण करणे हे आमचे कर्तव्य आहे असे प्रतिपादन महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी सातारा येथे पत्रकार परिषदेत बोलताना केले.

इंडिया आघाडीला मदत करणाऱ्या पुरोगामी राजकीय पक्ष , संघटना यांच्या प्रमुख कार्यकर्त्यांची सातारा जिल्हा समन्वय बैठक आज सातारा जिल्हा काँग्रेस कमिटी मध्ये संपन्न झाली. या बैठकीला खा. श्रीनिवास पाटील , माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण , माजी मंत्री व काँग्रेसचे नेते सतेज बंटी पाटील , माजी मंत्री व राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आ.बाळासाहेब पाटील आ शशिकांत शिंदे माजी आमदार लक्ष्मण माने श्रमिक मुक्ती दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ भारत पाटणकर उपस्थित होते. त्यांनी बैठकीला मार्गदर्शन केले. या बैठकीनंतर आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेमध्ये पृथ्वीराज चव्हाण बोलत होते.

भारतीय जनता पक्षाने इंग्रजांची फोडा व झोडा ही नीती अवलंबल्याचे दिसत आहे. कारण त्यांनी घराघरात भांडणे लावली पक्ष फोडले , घरे फोडली , जाती-जातीत भांडणे लावली. धार्मिक द्वेष पसरवण्याचे काम केले. त्यांच्या विरोधी लढण्याचा संकल्प आजच्या या समन्वय समितीच्या बैठकीत करण्यात आलेला आहे असे पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले.

काँग्रेसचे नेते सतेज उर्फ बंटी पाटील यांनी आजच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे मुद्दे आलेले आहेत. जे मुद्दे जाहीरनाम्यात नक्कीच समाविष्ट केले जातील. आता यापुढे ही एकसंघ अशी वज्रमुठ भाजपचा पराभव करूनच थांबेल. लवकरच जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर बैठका, प्रशिक्षण शिबिरे घेतली जातील व भाजप विरोधातली धार अधिक तीव्र करून इंडिया आघाडीचा नक्कीच विजय करू असा निर्धार आजच्या बैठकीत करण्यात आला असे सांगितले. आ.बाळासाहेब पाटील , माजी आमदार लक्ष्मण माने डॉ भारत पाटणकर, प्रा. नितीन बानगुडे पाटील यांनी मार्गदर्शन केले. आजच्या सातारा जिल्हा समन्वय समिती बैठकीला ३८ संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. आजच्या या बैठकीनंतर मुंबईत होणाऱ्या इंडिया आघाडीच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी खा. श्रीनिवास पाटील व आ. बाळासाहेब पाटील हे खास हेलिकॉप्टरने रवाना झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार व राज्य राज्यातील भाजपची सरकारे ही भ्रष्टाचाराची कुरणे झालेली आहेत. त्या विरोधात या निवडणुकीच्या दरम्यान प्रचारात भर दिला जाईल. तसेच इलेक्ट्रॉल बाँडची माहिती देण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया टाळाटाळ करत असल्याने त्यांच्या विरोधात लवकरच ठीकठिकाणी मोर्चाचे आयोजन करण्यात येणार आहे असे यावेळी ठरवण्यात आले.

# जावळी तालुक्यातील खडकावर यशस्वी केली टोमॅटोची बाग



**पाचगणी :** जावळी तालुक्यातल्या शेते गावातील शेतकऱ्यांना कमालच केली. तीव्र उन्हाळ्यात दुष्काळ परिस्थिती असताना पाण्याची कमतरता या सर्व नैसर्गिक संकटावर मात करत

खडकावर यशस्वी केली टोमॅटोची शेती शेते गावच्या प्रवीण पवार ज्या शेतकऱ्यांने जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर आणि मेहनतीवर टोमॅटोची शेती खडकावर टोमॅटोच्या रोपांची लागण करून यशस्वी करून दाखवली आहे आता ही टोमॅटोची सहा फूट उंचीची रोपे ऐन भरात आली आहेत टोमॅटोच्या फळांनी गजबजली आहे

एकरी ५० टनाचे उत्पादन घेत २५ ते ३० लाख रुपये या टोमॅटोच्या शेतीतून उत्पादन घेतले आहे. टोमॅटोचे पीक जास्तीत जास्त दोन ते अडीच फूट उंचीचे असते मात्र खडकाळ जमिनीवर सहा फूट उंचीचे टोमॅटोचे पीक सेंद्रिय शेतीच्या वापर करू विषमुक्त शेतीचा संदेश दिला आहे.

सहा फूट उंचीचे टोमॅटोची प्लांट तुम्ही कधी पाहिला आहे का जावळी तालुक्यातील शेते गावात पवार या शेतकऱ्यांना खडकावर शेती करून दाखवली आहे. तर मग पहा या टोमॅटो उत्पादक शेतकऱ्याची संघर्षमय कहानी व प्रत्यक्ष या माळरानावरील खडकाळ जमिनीवर हिरवगार उभा राहिलेलं टोमॅटोचं पीक पाहिल्यानंतर प्रत्येक शेतकऱ्यांना कौतुक करावा असा शेतीचा प्लॉट यशस्वी करून दाखवला आहे.

**टोमॅटो उत्पादक शेतकरी हे जावळी तालुक्यातील शेते गावात गेल्या अनेक वर्षापासून आम्ही शेती करतोय आम्ही स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकरी आहोत डोंगराच्या पायथ्यालाच खडकाळ जमिनीवर दोन दोन लेअर गाळाची माती टाकून शेती तयार केली आणि दीड एकरामध्ये टोमॅटोची रोप लावली आता ही टोमॅटोची रोपे सहा फूट उंचीची झाली असून याला ५० टन टोमॅटोची फळे लागली आहे मार्केटमध्ये तीस ते पंचवीस रुपयांचा भाव मिळाल तर एकरी २५ ते ३० लाख रुपये उत्पादन मिळण्याची शक्यता आहे सेंद्रिय शेती करून एक आगळावेगळा प्रयोग करून दाखवला आहे इतर शेतकऱ्यांनी याचा आदर्श घ्याव.**

**- शेतकरी प्रवीण पवार**

खडकावर टोमॅटोची शेती कशी यशस्वी केली दीड एकरामध्ये ५० टन टोमॅटोची घेतले आहे.

# क्राईम

## पाडेगांव येथे ऊसाची ट्रॉली अंगावरून गेल्याने वृद्ध महिला जागीच ठार, एक जखमी

**लोणंद :** लोणंद निरा रोडवर पाडेगांव टोलनाका (ता.खंडाळा) येथील जयदुर्गा मंगल कार्यालयाजवळून पाडेगांव फार्मकडे जाणाऱ्या रस्त्यावर ऊसाच्या ट्रॅक्टरच्या मागील चाकाचा धक्का लागल्याने ऊसाने भरलेली ट्रॉली अंगावरून गेल्याने दुचाकीवरील वृद्ध महिला जागीच ठार झाली. ही घटना सोमवारी (दि.४) संध्याकाळी पावणेसहा वाजण्याच्या सुमारास घडली. अलका किसन लडकत (वय-७०) रा. निळूंज, ता. पुरंदर असे मृत्यू झालेल्या वृद्ध महिलेचे नांव आहे.

याबाबत लोणंद पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, सोमवारी (दि.४) संध्याकाळी पावणेसहा वाजण्याच्या सुमारास किसन विठ्ठल लडकत व अलका किसन लडकत (रा.निळूंज, ता.पुरंदर, जि.पुणे ) हे पाडेगांव फार्म येथील नातेवाईकांचा वर्षश्राद्धाचा कार्यक्रम आटोपून हिरो होंडा स्पलेंडर एम.एच.१२-एच.के.९२९९ या दुचाकीवरून नीरा बाजूकडे निघाले होते. समोरून पाडेगांव येथील जुन्या टोल नाक्याजवळील जयदुर्गा मंगल कार्यालया जवळून पाडेगांव फार्मकडे ऊसाने दोन ट्रॉली भरून चाललेल्या ट्रँक्टर क्रमांक एम.एच.११ सी.क्यू ८७९४ वरील ट्रँक्टर चालक नितीन शिवाजी भंडलकर हा वेडा वाकडा ट्रँक्टर चालवित असताना ट्रॅक्टरचा दुचाकीला उजव्या बाजूचा पाठीमागील चाकाचा धक्का लागला.त्यामुळे दुचाकी वरील किसन लडकत व अलका लडकत बाजूस पडले. त्यावेळी अलका लडकत यांच्या अंगावरून ट्रॅक्टरला जोडलेल्या ऊसाने भरलेल्या दोन ट्रॉल्या अंगावरून गेल्याने त्या जागीच मृत्यूमुखी पडल्या. या घटनेची फिर्याद संदीप दत्तात्रय होले रा.खानवडी ता.पुरंदर यांनी लोणंद पोलिस स्टेशनला दिली. यावरून लोणंद पोलिसांनी ट्रँक्टर चालकाविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा तपास लोणंद पोलिस स्टेशनचे पोलिस हवालदार धनाजी भोसले करीत आहेत.

## अपघातात एकास जखमी केल्याप्रकरणी महिला चालकावर गुन्हा

**सातारा :** अपघातात एकास जखमी केल्याप्रकरणी महिला चालकाविरोधात सातारा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, बॉम्बे रेस्टॉरंट चौक परिसरात कारची दुचाकीला धडक बसून जखमी केल्याप्रकरणी सातारा शहर पोलिस ठाण्यात कार चालक असलेल्या महिलेवर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अल्पेश अनिल गवळी (वय २७, रा. शाहूपुरी, सातारा) यांनी तक्रार दिली आहे. ही घटना दि. २ फेब्रुवारी रोजी घडली आहे. तक्रारदार अल्पेश हे बहीणीसोबत दुचाकीवरुन जात असताना एमएच ४३ डीई १८०१ या कारची त्यांना धडक बसली. यावेळी कार चालक महिला असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

## टॉवरमधील साहित्य चोरुन नेल्याप्रकरणी अज्ञाताविरुध्द गुन्हा

**सातारा :** टॉवरमधील साहित्य चोरुन नेल्याप्रकरणी अज्ञाताविरुध्द सातारा तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, खांडवी, लिंब ता.सातारा येथे टॉवरमधील ६१ हजार रुपये किंमतीचे विविध साहित्य चोरुन नेल्याप्रकरणी अज्ञाताविरुध्द मयुर आबासो पाटील (वय २८, रा. माजगाव ता.पाटण) यांनी सातारा तालुका पोलिस ठाण्यात तक्रार दिली. ही घटना दि. ९ फेब्रुवारी रोजी घडली आहे.

## अंजठा चौक परिसरातून दुचाकीची चोरी

**सातारा :** अंजठा चौक परिसरातून अज्ञाताने दुचाकीची चोरी केल्याची फिर्याद सातारा शहर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, अंजठा चौक परिसरातून अज्ञात चोरट्याने एमएच ११ बीआर ७९०८ यह क्रमांकाची दुचाकी चोरुन नेली. ही घटना दि. २३ फेब्रुवारी रोजी घडली असून याप्रकरणी सचिन शंकर कणसे (वय ३५, रा. अंगापूर ता.सातारा) यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली.

## दुचाकीवरुन घसरुन एकाचा मृत्यू

**सातारा :** दुचाकीवरुन घसरुन एकाचा मृत्यू झाल्याची नोंद सातारा शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, बॉम्बे रेस्टॉरंट ते वाढे फाटा रस्त्यावर डोक्याला हेल्मेट न घालता दुचाकीवरुन घसरुन पडून स्वत:च्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी आदिनाथ प्रकाश भोरे (वय २७, रा.लक्ष्मी टेकडी, सातारा) याच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना दि. १४ जानेवारी घडली होती. याप्रकरणी पोलिस मेचकर यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

# सातारा लोकसभा मतदारसंघ
# महायुतीमध्ये कोणाच्या वाटयाला

## मविआची बारामतीत गोपनीय खलबते

**सातारा :** सातारा लोकसभा मतदारसंघ महायुती व महाविकास आघाडी यांच्यासाठी प्रतिष्ठेचा ठरणार आहे. भाजप ने पहिली यादी जाहीर केली असली तरी साताऱ्यातून खासदार उदयनराजे भोसले यांनी मजबूत दावेदारी पेश केली आहे. अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादीने साताऱ्यावर दावा सांगितला तरी त्यांना उदयनराजे यांना टक्कर देणारा उमेदवार मिळाला नाही. शिंदे गटाने साताऱ्यात पुरूषोत्तम जाधव यांच्यासह काही पर्यायाची चाचपणी केली आहे. महाविकास आघाडीची पुणे व बारामती येथे बैठकीद्वारे रणनीतीचे आयोजन केले आहे अद्याप उमेदवार जाहीर केलेला नाही.

सातारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असा समज असताना त्या पक्षाच्या दुफळीचा बरोब्बर फायदा उठवत उदयनराजेंना पुढे करून निवडून आणण्याची व्यहरचना भाजपाकडून होत आहे. उदयनराजेंनीही बेरजेचे राजकारण करत लोकसभेसाठी पक्ष आणि जिल्हा पातळीवर जोरदार तयारी सुरु केली आहे.

मागील दोन अडीच वर्षात राज्यातील झालेल्या घडामोडींचा मोठा परिणाम सातारा मतदारसंघाच्या राजकारणावर झाला आहे. महायुतीतील भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेना (शिंदे गट) हे तीनही पक्ष सातारा लोकसभेसाठी टोकाचे आग्रही आहेत.

भाजपाकडून उदयनराजे, राष्ट्रवादी काँग्रेसकडून नितीन पाटील आणि शिवसेनेकडून पुरुषोत्तम जाधव यांची नावे चर्चेत आहेत. यातील पुरुषोत्तम जाधव यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे उमेदवारी मागितली आहे. मात्र या पक्षाचे सध्याचे कमकुवत पक्ष संघटन असल्याने याचा विचार किती होतो हे महायुतीच्या तिकीट वाटपाच्या बैठकीत ठरेल. भाजपाने मात्र मागील दीडएक वर्षात लोकसभा विधानसभा निवडणुकांच्या दृष्टीने पक्ष संघटन मजबूत करण्यावर भर दिला आहे. त्याचाच फायदा उठवण्याचा प्रयत्न भाजपाकडून उदयनराजे यांना पुढे करून होत आहे.

उदयनराजेंनीही बेरजेचे राजकारण करत पक्ष आणि महायुतीतील स्थानिक आमदार नेत्यांचा संपर्क वाढवला आहे.

दिल्लीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदीं, अमित शहांपासून अनेक केंद्रीय मंत्र्यांशी त्यांचा निकटचा संपर्क आहे. त्यांनी नियमित साताऱ्याच्या प्रश्नांसाठी पाठपुरावा केला आहे. तसाच पाठपुरावा श्रीनिवास पाटील यांनीही केला आहे.

मी म्हणजे पक्ष आणि पक्ष गेला खड्ड्यात असे म्हणणारे, उदयनराजे आज भाजपच्या अनेक वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये दिसू लागले आहेत. कार्यक्रमांमध्ये संघ आणि भाजपाच्या पदाधिकाऱ्यांना ते सोबत घेत आहे मागच्या पराभवाची पुनरावृत्ती नको, कोणाचा रोष नको यासाठी उदयनराजे आणि त्यांचे सहकारी कटाक्षाने प्रयत्न करत आहेत. महायुतीतून जे उमेदवारी मागत आहेत ते माझ्यासाठीच मागत आहेत असे सांगत उदयनराजेंनी आपल्या उमेदवारीचे सुतोवाच केले आहे.

**२०१९ लोकसभा मिळालेली मते-**
**उदयनराजे ५ लाख ७९ हजार २६, नरेंद्र पाटील यांना ४ लाख ५२ हजार ४९८**

**पोटनिवडणूक**
**श्रीनिवास पाटील ६ लाख ३६ हजार ६२०, उदयनराजेंना ५ लाख ४८हजार ९०३**

## महात्मा बसवेश्वर सामाजिक समता - शिवा पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**सातारा :** राज्यातील वीरशैव - लिंगायत समाजाचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकास होण्यासाठी कलात्मक, समाजप्रबोधन व साहित्यिक क्षेत्रात कार्य करणा-या कलावंत, साहित्यिक, समाज प्रबोधनकार व समाज सेवकांना आणि यासाठी कार्य करणा-या संस्थांना, महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिवर्षी वैशाख शुद्ध (अक्षय तृतीया) या दिवशी महात्मा बसवेश्वर यांच्या नावे एक व्यक्ती आणि एका संस्थेला महात्मा बसवेश्वर सामाजिक समता शिवा पुरस्कार जाहीर केला जाणार आहे.

या पुरस्कारासाठी पुरुष वयोमर्यादा किमान ५० वर्षे तर महिला किमान ४० वर्षे असून सामाजिक संस्थेसाठी सदर क्षेत्रातील किमान १० वर्षे कार्य असा निकष आहे. इच्छुक व्यक्ती आणि संस्था यांनी सदर वृत्त प्रसिद्ध झालेनंतर १५ (पंधरा) दिवसांचे आत ४ प्रतीमध्ये सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा कार्यालयामध्ये आपले अर्ज आणि संबंधीत कागदपत्रे सादर करावी असे आवाहन संतोष जाधव, सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, सातारा यांनी केले आहे.

# देऊर येथे ४ लाख ६७ हजार रुपये किमतीची अफूची झाडे जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**कोरेगाव :** देऊर ता. कोरेगाव येथील जातेखान नावाच्या शिवारात कांद्याच्या पिकामध्ये अफूच्या झाडाची लागवड करून ती जोपासल्या प्रकरणी देऊर येथील एकास वाठार पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मधुकर शिवाजी कदम वय ५८ रा. देऊर ता. कोरेगाव असे संशयित शेतकऱ्याचे नाव आहे.

वाठार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मधुकर शिवाजी कदम रा. देऊर यांनी त्यांच्या जातेखान शिवारात असलेल्या गट नंबर १५१ मधील शेतात कांद्याच्या पिकात अफू या अमली पदार्थाच्या झाडांची लागवड करून त्याची जोपासना केली होती ही माहिती गुप्तहेरा मार्फत स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांना मिळाली या माहितीच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा पथकाने काल सोमवार दिनांक ४ मार्च रोजी सायंकाळी ८:३० वाजण्याच्या सुमारास देऊर येथील जातेखान शिवारातील कदम यांच्या कांद्याच्या शेतात छापा मारला असता. मधुकर कदम हे स्वतः आपल्या शेतात हजर होते यावेळी कांद्याच्या पिकामध्ये ४ लाख ६७ हजार रुपये किमतीची २३ किलो वजनाची २२१ अफू या अमली पदार्थाची झाडे आढळून आली. यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे लैलेश अशोक फडतरे यांनी सदर अमली पदार्थ व संशयित शेतकऱ्याला वाठार पोलिसांच्या ताब्यात दिले. वाठार पोलिसांनी मधुकर कदम यांच्या विरोधात गुंगीकारक औषधी द्रव्य व घटक अधिनियम १९८५ कलम ८.१८ प्रमाणे गुन्हा दाखल करून घेतला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष कांबळे करीत आहेत.

## महिलादिनानिमित्त दि.७ रोजी सातारा येथे रोजगार मेळावा

**सातारा :** जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी विविध शासकीय योजना व त्यासंबंधी माहीती विषयक मेळावा आयोजीत करण्यात आला आहे. या मेळाव्यात राज्य सरकार व केंद्र सरकारच्या विविध योजनांबाबत माहीती व त्यासाठी मिळणारे कर्ज अनुदान व सबसिडी या बाबत तज्ञ मार्गदर्शक प्रेमराज शिंदे (राष्ट्रीय पारितोषिक विजेते) हे माहीती देणार आहेत. त्यानंतर ज्यांना ज्यांना उद्योग करावयाची इच्छा असेल त्यांना मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे.तरी या योजनांचा लाभ घेण्यास येथील बुधवार नाका शाळा येथे गुरुवार दि. ७ रोजी दुपारी १२ वा. महिला व मुली यांनी उपस्थीत रहावे.असे आवाहन संयोजकातर्फे केले आहे.

# माण तालुक्यातील मध्यमप्रकल्प आटण्याच्या मार्गावर

## आंधळी धरणाच्या पाण्याने टंचाईत दिलासा,उरमोडीच्या पाण्याची प्रतीक्षा

**दहिवडी :** माण तालुक्यात पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली असून तालुक्यातील ५४ गावे व १९० वाड्यावस्त्यांना ५४ टँकरच्या १२५ खेपाव्दारे पाणीपूरवठा सुरू आहे. पाणीपुरवठ्यात शासनाचे चार व खासगी पन्नास असा टँकरचा समावेश आहे. पाणी पुरवठ्याकरिता दहा विहिरी व अकरा बोरवेल अधिग्रहण करण्यात आले आहेत. तर ढाकणी, राणंद, पिंगळी बू., मलवडी, राणंद, गोंदवले बू. या ठिकाणी टँकर फीडिंग पॉइंट करण्यात आले आहेत. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यातच तालुक्यात पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू झाले असल्याने नागरिकांच्या बरोबरच जनावरांच्या पाण्याचे हाल सुरू झाले आहेत. सद्या तालुका पन्नास टक्क्याच्यावर टँकरग्रस्त झाला असून थोड्या दिवसात टँकर भरण्यासाठीची परिस्थिती कठीण होऊन बसणार आहे, तालुक्यातील मध्यमप्रकल्प, पाणीसाठे आटण्याच्या मार्गावर आहेत.

गावोगावच्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेच्या विहीरींनी कधीच तळ गाठला असून असून या कोरड्या विहीरींचा वापर फक्त टँकरमधील आणलेलेल पाणी ओतून घेण्यासाठी व त्यातून गावठाणात पाणीपुरवठा करण्यासाठी होत आहे. माणगंगा नदीवर असलेले कोल्हापूर पध्दतीचे व सिमेंट साखळी बंधारे गेल्या दोन-अडीच महिन्यापासून कोरडे ठणठणीत पडले आहे. नदीकाठच्या, बंधारा परिसरातील विहीरींनीसुद्धा तळ गाठला आहे. अशा परिस्थितीला शेतकरी, पशुपालक सामोरे जात आहे. भूगर्भातील पाणी पाणी पातळी घटत चालली असून पाण्याचे दुभिक्ष वाढत चालले आहे.

तालुक्यातील आंधळी धरण, गंगोती मध्यम प्रकल्प वगळता उर्वरित सर्वच्या सर्व मध्यम व लघू पाटबंधारे प्रकल्पांमधील पाणीसाठा संपुष्टात आला असल्याने ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर पाणी टंचाईचे गंभीर सावट निर्माण झाले आहे. जिहे कटापूर योजना नुकतीच पूर्ण होऊन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जलपूजन करण्यात आले. आमदार जयकुमार गोरे यांच्या प्रयत्नातून कृष्णेचे पाणी नेर तलावातून आंधळी धरणात आणून सोडल्याने या धरणात बेचाळीस टक्के पाणीसाठा निर्माण झाला आहे. या पाणीसाठ्याने दुष्काळी परिस्थितीत पश्चिम भागाला दिलासा मिळाल्याची भावना निर्माण झाली आहे. उरमोडी योजनेचे पाणी सोडल्यास लोधवडे ढाकणी तलाव भरण्यास मदत होणार असल्याने या परिसरातील शेतकरी या पाण्याच्या प्रतीक्षेत आहेत.

या वर्षी निसर्गाची वक्रदृष्टी निर्माण झाल्याने पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिले परिणामी माण तालुक्यातील जलाशय पाण्याने भरले गेले नाहीत. पाणी नसल्याने शेतकऱ्यांना रब्बी हंगामातच पाणी टंचाईचा सामना करावा लागला.

सध्या ब्रिटीशकालीन पिंगळी तलाव,राणंद, ढाकणी, लोधवडे, जांभुळणी,मासाळवाडी, महाबळेश्वरवाडी, जाशी प्रकल्पांमध्ये पाण्याची परिस्थिती निरंक आहे. केवळ गंगोती तलावात प्रकल्पीय १.३६ द.ल.घ.मी. पाणीसाठ्यापैकी ०.३० म्हणजे २२ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. प्रकल्पीय ७.४३ द.ल.घ.मी. पाणीसाठा असलेल्या आंधळी धरणात जिहे कटापूर योजनेचे पाणी आणून सोडल्याने कोरडा पडू लागलेल्या धरणाचा पाणीसाठा बेचाळीस टक्क्यांवर जाऊन पोहोचला आहे. या पाणीसाठ्याने टंचाईच्या काळात प्रशासनाला दिलासा मिळाला आहे.

**उरमोडी योजनेच्या पाण्याचा फायदा माणगंगेला**

ऐन पावसाळ्यात पावसाने हुलकावणी दिली होती, खरिपाच्या पेरण्या शेतकऱ्यांनी उरकून घेतल्या अन पिकाला पाणी नसल्याने शेतकरी हवालदिल झाला होता. मात्र अशा बिकट परिस्थितीत उरमोडी पाणी योजनेचे पाणी गोंदवले पासून म्हसवड पर्यंतच्या पूर्व भागात माणगंगेत सोडले होते. माणगंगेला पाणी सोडल्याने नदीकाठच्या परिसरातील शेतकऱ्यांचा पाणी प्रश्न सुटला होता. आज अखेर या पाण्याचा फायदा खरीपव रब्बी हंगामातून झालेला पाहायला मिळाला आहे. उरमोडी योजनेचे पाणी कालव्याव्दारे नुकतेच खटाव तालुक्यात सोडण्यात आले असून माण तालुक्यातील शेतकरी पाण्याच्या प्रतीक्षेत आहेत.

यावर्षीचा रब्बी हंगाम उपलब्ध झालेल्या पाण्यावर मार्गी लागला असून या हंगामाची सुगी संपत आली आहे. आता शेतकऱ्यांची उन्हाळी पिकासाठी लगबग सुरु असली तरी पाण्याचे नियोजन अत्यंत महत्वाचे आहे. प्रामुख्याने शेतकरी उन्हाळ्याच्या हंगामात जनावरांच्या चाऱ्याची पिके अग्रक्रमाने घेत असतात मात्र सद्य परिस्थितीमध्ये शेती सिंचनासाठी पाण्याचा तुटवडा जाणवू लागला आहे. या हंगामात पाण्याअभावी शेतकऱ्यांना उन्हाळी पिकाचे नियोजन करता येणार नसल्याची परिस्थिती उद्भवू लागली आहे. दिवसेंदिवस उन्हाचा तडाका वाढून प्रचंड उष्णता निर्माण होऊन पाण्याचे बास्पिभवन सुरु आहे. परिणामी तालुक्यातील भूजल साठे आटू लागले आहेत. आगामी काही दिवसात पिण्याच्या पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार आहे.

**यावर्षी पावसाने दडी मारली असल्याने लवकरच पपाणी टंचाई निर्माण झाली आहे. शासनाने तातडीने लक्ष घालून केंद्र सरकारने गावोगावी सुरू केलेल्या पेयजल योजना पूर्ण कराव्यात म्हणजे पिण्याच्या पाणी टंचाईला नागरिकांना सामोरे जावे लागणार नाही. जेणे करून नागरिकांना पेयजल योजनेच्या माध्यमातून पाणी मिळाल्यास टँकरची वाट पहावी लागणार नाही.**

**- बाळासाहेब रणपिसे, माजी सभापती**

# 'कोल्हापूर'साठी काँग्रेसकडून शाहू छत्रपती उमेदवार निश्चित

**कोल्हापूर :** काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) या दोघांनाही हवा असलेला कोल्हापूर लोकसभा मतदार संघ काँग्रेसला देत तेथून शाहू छत्रपती यांना काँग्रेसकडून उमेदवारी देण्याचा निर्णय मंगळवारी मुंबईत झालेल्या महाविकास आघाडीच्या बैठकीत घेण्यात आल्याची खात्रीलायक माहिती आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या सिल्व्हर ओक या निवासस्थानी आज बुधवारी होणाऱ्या महाविकासच्या बैठकीत शाहू छत्रपती यांच्या उमेदवारीची घोषणा होणार असल्याचे समजते.



कोल्हापूर लोकसभा मतदार संघ गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेनेकडे आहे. मात्र, बदलत्या राजकीय समीकरणात शिवसेनेची शकले झाल्यानंतर या मतदारसंघावर दावा सांगत काँग्रेसने शाहू छत्रपती यांना मैदानात उतरविण्याची तयारी सुरू केली आहे. मात्र, आपला पारंपरिक मतदारसंघ सहजासहजी काँग्रेसला सोडायला शिवसेना तयार नव्हती. या एकाच जागेवरून गेल्या आठवड्यापासून दोन्ही पक्षांत अंतर्गत जोरदार घमासान सुरू असताना सोमवारी शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, शरद पवार यांच्यासह महाविकास आघाडीतील प्रमुख नेत्यांची मुंबईत बैठक झाली. यात प्रामुख्याने कोल्हापूरच्या जागेबाबत चर्चा झाली. या बैठकीत कोल्हापूरची जागा काँग्रेसला देण्याबाबत शिवसेनेने सहमती दर्शविली असल्याचे कळते. याबाबतचा निर्णय आजच्या बैठकीत जाहीर करण्यात येणार आहे.

कोल्हापूर व हातकणंगले हे दोन्ही मतदारसंघ पूर्वी भाजप- शिवसेना युतीत सेनेकडे होते. भाजपपासून काडीमोड घेतल्यानंतर शिवसेनेने (उद्धव बाळासाहेब ठाकरे) हे दोन्ही मतदारसंघ लढविण्यासाठी कंबर कसली होती. मात्र, शिवसेनेने यातील हातकणंगले लोकसभा मतदारसंघ माजी खासदार राजू शेट्टी यांना सोडत कोल्हापूर लोकसभा मतदारसंघावरचा दावा अधिक घट्ट केला होता. या जागेवर काँग्रेसने दावा ठोकताच पश्चिम महाराष्ट्रात लोकसभा लढवायला आमच्याकडे एकही जागा उरत नसल्याचे शिवसेनेचे म्हणणे होते.

मात्र, हातकणंगलेची जागा शिवसेनेची आहे. त्यांच्या कोट्यातून त्यांनी ती राजू शेट्टी यांना दिल्याचे काँग्रेसच्या नेत्यांनी निदर्शनास आणून दिले. हातकणंगलेची जागा शिवसेनेकडे आहे, हवे तर त्यांनी ती लढवावी, असे सुचवत कोल्हापूरच्या दोन्ही जागा आमच्याकडे नाहीत, असे शिवसेना कशी काय म्हणू शकते ? अशी मांडणी काँग्रेसने केली.

# बांधकामाला वेग; त्यानंतरही सिमेंट आणि स्टीलचे भाव स्थिर

**नागपूर :** दरवर्षी उन्हाळ्यात बांधकामाचा वेग वाढताच सिमेंट आणि स्टीलचे भाव वाढतात, असा बिल्डरांचा अनुभव आहे. पण यंदा सिमेंटचे भाव स्थिर असून स्टीलचे भाव उतरले आहेत. दोन महिन्यांच्या तुलनेत प्रति किलो ५ रुपयांनी स्वस्त झाले आहेत. बाजारात ८ ते २५ एमएम स्टीलचे (सळाख) भाव १८ टक्के जीएसटीसह ५५ ते ५७ रुपये किलो आहेत. दोन वर्षांच्या तुलनेत स्टीलचे भाव प्रति किलो २० रुपयांनी कमी झाले आहेत. दरकपातीचा ग्राहकांचा फायदा होत आहे.



सिमेंटचे भाव प्रति बॅग ३३० ते ३४० रुपये, तर रेती ५५ ते ६० रुपये फूट विकली जात आहे. डम्परचे भाव २५ हजार रुपयांपर्यंत पोहोचल्याने बांधकाम खर्च वाढला आहे. तर विटांचे भाव स्थिर आहेत. मागणी कमी असल्याने भाव बदलेले नाहीत. विटांचे उत्पादन करणाऱ्यांना कामगारांचा तुटवडा जाणवत आहे. मात्र, पुढील हंगामात स्थिती बदलणार असून सध्या मातीच्या एक हजार विटांसाठी ७००० ते ७५०० रुपये मोजावे लागत आहेत.

**राज्य सरकारच्या धोरणाने रेतीची दरवाढ**

**बांधकाम व्यावसायिक म्हणाले, जानेवारी ते जून हा बांधकामाचा हंगाम असतो. या दिवसात बांधकामाचा वेग वाढतो. सोबतच कच्च्या मालाच्या किमतीही वाढतात. पण यंदा दरवाढ झाली नाही, ही आश्चर्यकारक बाब आहे. मात्र, राज्य सरकारच्या धोरणाने रेतीचे भाव वाढले आहेत. रेती घाट वैधपणे सुरू केल्यास दर कमी होतील. त्या तुलनेत विटा, सिमेंट आणि स्टीलचे भाव कमी झाले आहेत.**

### बांधकामाच्या खर्चावर नियंत्रण

**क्रेडाईनागपूरमेट्रोचे पदाधिकारी म्हणाले, गेल्यावर्षी बांधकामाला लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतीत मोठी वाढ झाल्याने बांधकामाचा खर्च वाढला होता. पण आता दर कमी झाल्याने अनेक किमतीत बदल झाले आहेत. सध्या सिमेंट, स्टील आणि विटांचे भाव कमी आहेत. त्यामुळे बिल्डरांची गुंतवणूक काही प्रमाणात कमी झाली. अशा स्थितीत ग्राहकांना आवडत्या घराच्या खरेदीची उत्तम संधी आहे. त्यांचे घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे. बिल्डरांनी किमती स्थिर ठेवल्याचा फायदा ग्राहकांना होत आहे.**

### निवडणुकीपर्यंत भाववाढीची शक्यता कमीच

**स्टीलची किंमत हंगामात कमी होणे, ही आश्चर्यकारक बाब आहे. ८ एमएम सळाख ४७.५० रुपये किलो आणि १२ ते २५ एमएचे भाव ४६ रुपये किलो आहेत. त्यावर १८ टक्के जीएसटी आकारला जातो. हे भाव दोन वर्षांच्या तुलनेत फारच कमी आहेत. बाजारात डिमांड कमी वा उत्पादन वाढल्याने भाव उतरले असावेत, असा अंदाज आहे. लोकसभा निवडणुकीपर्यंत भाव वाढण्याची शक्यता नाहीच. नागपुरात स्टील देशाच्या सर्वच भागातून येते. शिवाय नागपुरातही स्टीलचे उत्पादन होते. भाव आणखी कमी झाल्यास ग्राहकांचा फायदा होईल.**

**- राजेश सारडा, अध्यक्ष, स्टील ॲण्ड हार्डवेअर चेंबर ऑफ विदर्भ.**

# कृष्णा कालव्यातून दोन दिवसात पलूसला पाणी, सातारा जिल्हाधिकाऱ्यांकडून हिरवा कंदील

कृष्णा कालव्यातून दोन दिवसात पलूसला पाणी, सातारा जिल्हाधिकाऱ्यांकडून हिरवा कंदीलसांगली: कृष्णा कालव्यातपाणीसोडण्यासाठीसांगलीजिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सातारा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना पत्र पाठविले आहे. त्यानुसार डुडी यांनी तारळी धरणातून कृष्णा कालव्यात एक टीएमसीपाणीसोडण्यासाठी हिरवा कंदील दाखविला आहे. या निर्णयामुळे पलूस, वाळवा, तासगाव, मिरज, कऱ्हाड तालुक्यातील ५४ गावांच्या पाणीटंचाईचा प्रश्न सुटणार आहे.

कृष्णा कालव्याचे पाणी पलूस तालुक्यातील तुपारी ते वसगडेपर्यंत जाते. तालुक्यातील बहुतांश शेती ही आरफळ व कृष्णा कालव्यावर अवलंबून आहे. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून आरफळ योजना व कृष्णा कालव्यात पाणी सोडले नसल्याने या भागातील शेती धोक्यात आली आहे. पाण्याअभावी सध्या ऊस, द्राक्ष, केळी, भाजीपाला, फुले व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.

पाटबंधारे विभागातील राजकीय हस्तक्षेप थांबून कोर्टाच्या आदेशप्रमाणे कृष्णा कालव्यावर आरक्षित असलेले २.७० टीएमसी पाणी नियमित फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे, जून आवर्तन सुरळीत सुरू व्हावे, अन्यथा



अजूनही भीषण परिस्थिती उद्भवण्याची शक्यता आहे. सर्व शेतकऱ्यांचा दृष्टीने कृष्णा कालव्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावावा, अशी शेतकऱ्यांची मागणी होती.

मात्र, सातारा जिल्ह्यातील काही लोकप्रतिनिधींच्या हस्तक्षेपामुळे कृष्णा कालव्यात पाणी सोडले जात नव्हते. म्हणून शेतकरी आक्रमक झाले होते. याची गंभीर दखल घेऊन पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगली जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्याकडे तारळी धरणातून कृष्णा कालव्यात रब्बी हंगामासाठी एक टीएमसी पाणी सोडण्याचा प्रस्ताव दिला होता. त्यानुसार सांगली जिल्हाधिकाऱ्यांनी सातारा जिल्हाधिकारी यांच्याकडे एक टीएमसी पाणी सोडण्याची मागणी करणारे पत्र दिले आहे.

सातारा जिल्हाधिकारी डुडी यांनी सातारा जलसंपदा विभागाला तारळी धरणातून पाणी सोडण्याबाबत सूचना केली आहे. या निर्णयामुळे सांगली जिल्ह्यातील पलूस, वाळवा, तासगाव व मिरज तालुक्यातील १३ हजार ३६६ हेक्टर क्षेत्रातील शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे.

न्यायालयाने कृष्णा कालव्यात वर्षभरात २.७० टीएमसी पाणी सोडण्याचे आदेश दिले आहेत. तरीही पाटबंधारे विभागाचे अधिकारी आणि राजकीय नेत्यांकडून सांगली जिल्ह्यातील चार तालुक्यांतील ५४ गावांच्या हक्काचे पाणी अडविले जात आहे. खरीप आणि रब्बी हंगामामध्ये आतापर्यंत २.७० टीएमसीपैकी एकही टीएमसी पाणी सांगली जिल्ह्याला मिळाले नाही. लोकप्रतिनिधी आणि अधिकारी न्यायालयाचे आदेशही पाळणार नाहीत का, असा सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे.

# हडपसर उड्डाणपूलाखालील रस्त्यावर अतिक्रमणे वाढली

## अतिक्रमण कारवाई केल्यानंतर अर्ध्या तासात जैसे थे परस्थिती

**हडपसर :** हडपसर सोलापूर मुख्य रस्त्यावर उड्डाणपूलाखालील रस्त्यावर प्रचंड प्रमाणावर अतिक्रमणे वाढली असून भाजी विक्रेते , फळ विक्रेते, विविध विक्रेत्यांनी हडपसर उड्डाणपूलाखालील रस्ता व्यापून टाकलेला आहे , विविध विक्रत्यांमुळे हडपसर मधील सोलापूर मुख्य रस्त्यावर प्रचंड प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.



भाजी विक्रेते सकाळी संध्याकाळी उशिरापर्यंत ऐन रस्त्यावर रोडच्या मधोमध भाजीचे तसेच विविध विक्रीचे दुकान थाटतात यांमुळे येथील रस्त्यावर प्रचंड प्रमाणावर वाहतूक कोंडी होते.

हडपसर मधील भाजीमंडई चौकात ते गाडीतळ पर्यंत संपूर्ण रस्ता व्यापलेला असतो.अतिक्रमण विभागाकडून वारंवार कारवाई करीत असल्याचे अधिकारी सांगतात मात्र कारवाई केली की, लगेच अर्धा तासाचा आत परत आहे तशीच जैसे थे परिस्थिती निर्माण होते.मनपा

अतिक्रमण करणा-या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर वादविवाद , शिवीगाळ करीत, अंगावर धावून येतात असे अधिकारी सांगत आहेत. अतिक्रमण वाढण्याला विक्रेत्यांना कांही विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते बळ देत असल्याचे सांगण्यात येते.उड्डाणपूलाखालील विक्रेत्यांकडून प्रत्येकी दोन हजार , एक हजार रुपये घेऊन त्यांना बिनधास्त व्यवसाय करा, असा विश्वास देत असल्याचे त्यातील कांही विक्रेते सांगत आहेत.

# जिल्हा परिषदेतील पदाधिकारी निधी वाटपावरुन न्यायालयात जाण्याच्या तयारीत

**नागपूर :** शासन निर्णयानुसार प्रस्तावित कामाचा ग्रामसभेचा ठराव असल्याशिवाय कामांना मंजुरी मिळत नाही. ग्रामसभांचे ठराव नसताना काही गावांना जन सुविधा व नागरी सुविधांचा कोट्यवधीचा निधी देण्यात आला. तर दुसरीकडे जिल्हयातील दहा ते वीस हजार लोकसंख्येच्या अनेक गावांना छदामही मिळाला नाही. निधी वाटपातील भेदभावामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना विकासापासून वंचित राहावे लागत असल्याने या विरोधात उच्च न्यायालयात जाण्याच्या तयारीत जिल्हा परिषदेतील पदाधिकारी आहे. यामुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.- उ्नाएठढखडएचएछढजिल्हा नियोजन समितीने कामांची यादी मंजूर करताना जिल्हा परिषद सदस्यांच्या



प्रस्तावांना डावलण्यात आले. आमदारांच्या व स्थानिक नेत्यांच्या सूचनेनुसार जनसुविधा व नागरी सुविधांच्या कामांना मंजुरी देण्यात आल्याचा आरोप सदस्यांनी व पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या विशेष सभेत केला होता. शासन निकषानुसार मंजूर नियतव्याच्या दिड पटीचे जिल्हा परिषद सदस्यांचे प्रस्ताव मंजुरीसाठी नियोजन समितीकडे पाठविण्यात आले होते. परंतु सदस्यांची यादी डावलण्यात आली. नियोजन समितीने दुसऱ्या यादीला मंजुरी दिली. या प्रकरणाची चौकशी होईपर्यंत तांत्रिक मंजुरी न देण्याचे निर्देश अध्यक्षा मुक्ता कोकड्डे यांनी दिले.उपाध्यक्ष कुंदा राऊत व महिला बाल कल्याण सभापती अवंतिका लेकुरवाळे यांनी शासन निर्णयानुसार निधी वाटप न झाल्याचा मुद्दा उपस्थित केला होता.

**७० टक्के ग्रामपंचायतींचे ठरावच नाही**

जनसुविधा व नागरी सुविधांतील विकास कामांचे प्रस्ताव ग्रामसभेचा ठराव असल्याशिवाय मंजूर करता येत नाही. परंतु जिल्हा नियोजन समितीने मंजूर केलेल्या ५० कोटींच्या कामापैकी ७५ टक्के ग्रामपंचायतींनी ठरावच पाठिवलेले नाही. अशा जनसुविधा व नागरी सुविधांच्या कामांना मंजुरी कशी देण्यात आली. असा प्रश्न जि.प.अध्यक्ष् मुक्ता कोकडे, उपाध्यक्ष कुंदा राऊत यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला आहे.

### सभागृहाच्या प्रोसिडींगनंतर निर्णय

**मंजूर नियतव्ययाच्या दिडपटीहून अधिक प्रस्ताव कसे?**

**विकास कामांसाठी मंजूर असलेल्या नियतव्याच्या दिड पट प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे पाठविणे अपेक्षित होते. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या सदस्यांच्या सर्कलमधील कामांचा प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने पाठविला होता. दुसरीकडे आमदार व काही नेत्यांच्या सूचनेवरून नियोजन समितीकडे परस्पर प्रस्ताव पाठिवण्यात आले. आधिच दिडपट रकमेचे प्रस्ताव पाठवले असताना अधिक रकमेचे प्रस्ताव कुठल्या कायद्यानुसार पाठविण्यात आले. असा प्रश्न जि.प.पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला आहे.**

# हरिशचंद्रगडावर अडकलेल्या पर्यटकांना जीवनदान देणारा देवदूत काळाच्या पडद्याआड



**माळशेज ( खिरेश्वर ) :** परमेश्वर कधी कुणाची कशी परीक्षा घेईल सांगता येत नाही. कुणाच्या आयुष्यात कधी किती संकटे येतील किंवा निर्माण होतील सांगणं तर फारच कठीण आहे. आज अशाच संकटात तो सापडलायं. कधीकाळी हरिश्चंद्रगडावर अडकलेल्या पर्यटकांना रात्री अपरात्री जीवनदान देणारा हा देवदूतच आज जगण्यासाठी धडपडतोय. घरच्या हलाखीच्या परिस्थितीवर मात करत त्यातून आता कुठेतरी यशाच्या मार्गावर तो चालू लागला होता. गिर्यारोहण क्षेत्रात तो आता चांगलाच पारंगत होऊ लागला होता. गाईडच्या माध्यमातून तो दोन पैसे कमवून थकलेल्या आई- बाबांची भूक भागवू लागला होता व कुटुंबाला हातभार लावू लागला होता. परंतु काळाच्या मनात काही वेगळेच शिजत होते. शरीराच्या आतुन काहीतरी वेगळ्याच हालचाली घडतं होत्या. दोन घास पोटासाठी मिळावेत म्हणून शरीराच्या विकाराकडे तो दुर्लक्ष करू लागला होता. पुढ्यात काही भयंकर वाढून ठेवलंय हा विचार पण त्याने केला नव्हता. उपचारासाठी त्याने मुंबई गाठली खरी पण उपचाराचे ओझं पेलणार तर कसें? वृध्द माता पिता कुठून आणणार पैसे? पैसे मागावे तर कुणाकडे याच विचारांनी तो पुरता खचला.

गेली सहा महिने तो याच विचारांच्या ओझ्याखाली पुरता दबून गेला. मित्र भेटीला गेले की त्याला उपचारांचा सल्ला द्यायचे खरे; पण उपचारासाठी पैसाच नाही हे सांगायला त्याने संकोच केला. अनेक वेदना सहन करत तो गेली कित्येक दिवस अनेक यातना घेऊन जगतोय. एक महिनाभरापूर्वी तो आजारी असल्याबाबतची बातमी कानावर आली आणि ती ऐकून मी अक्षरशः हादरून गेलो. कारणही तसेच होते, हा तरुण उपचार घेण्यासाठी तयारच नव्हता. त्याला अनेक वेळा उपचार घेण्यासाठी मित्रांनी विनवण्या केल्या परंतु तो नाहीच म्हणत होता. सह्याद्रीच्या कुशीतच मला विसावा घ्यावासा वाटतो असे उत्तर तो देत होता. दोन वर्षांपूर्वी त्याची आणि माझी भेट रात्री हरिश्चंद्रगडावर झाली त्या भेटीचे कारणही रेस्क्युच होते. प्रतिक तळेकर नावाचा मुलगा तीन दिवस हरिश्चंद्रगडावर धुक्यात भटकत होता. त्याला गडावरून खाली उतरण्याचा मार्गच सापडत नव्हता. शेवटी तीसऱ्या दिवशी तो रात्री आम्हाला सापडला होता याचं श्रेय पण जगण्यासाठी धडपडणाऱ्या या देवदूतासच दिले पाहिजे.

कारण हा देवदूत आणि त्याचा मित्र जुन्नर दरवाजाने प्रतीकला शोधायला हरिश्चंद्रगडावर गेले होते. माझी टीम टोलारखिंडी मार्गे शोध घेत होती तर बेलपाड्यातुन नळीच्या वाटेने कमळू पोकळा व त्यांचे बंधू दोघेच अंधारात नळीच्या वाटेने वर येत होते. हरिश्चंद्रगडाच्या बालेकिल्ल्याच्या दक्षिणेस या देवदूतासच प्रतिक भेटला व आमचा व त्यांचा संपर्क तेथेच जवळ घडून आला; तिच माझी आणि या देवदूताची प्रथम भेट होती. त्यानंतर गेल्या वर्षी पावसाळ्यात हा देवदूत पुन्हा एकदा समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात चर्चेत आला. हरिश्चंद्रगडावर एका तरूणाचा मृत्यू झाला होता. त्या मृताच्यासोबत चार जणांसह एक बारा वर्षांचं पोरगं जीव वाचवण्यासाठी संघर्ष करत होतं. त्या संकटात सापडलेल्यांना संकटमोचक बनून शोधून काढायचं काम व त्यांना सुखरूप खाली आणण्याचं काम याच देवदूताने अर्थात जुन्नर तालुक्यातील खिरेश्वर गावचे भूमीपुत्र बाळू चहादू रेंगडे यानेच केले होते. अशा अनेक रेस्क्युंमध्ये संकटमोचक बनून बाळू रेंगडे अनेकांच्या मदतीला धावून गेला.

महिनाभरापूर्वी मी सकाळ सन्मान पुरस्कारासाठी मुंबईला गेलो होतो. जाता जाता मुंबईमध्ये मी स्तंभलेखक संजय नलावडे यांच्या घरी भेट देण्यासाठी गेलो होतो.

तिथे बाळूचा विषय निघाला आणि बाळू गंभीर आजारी असल्याचे मला समजलं. आकुर्डी येथील ट्रेकर संग्राम कुलकर्णीसरांनी सुरूवातीला बाळूला, ज्याने कुटुंबाचा व स्वतःच्या जिवाचा विचार न करता अनेकांना जीवनदान देणारा बाळू तो उपचारासाठी तयार होतोय हा निर्धार केला होता. सकाळी बाळूच्या मोबाईलवर कॉल केला आणि पलिकडून महिलेचा आवाज कानी पडला, ' महिलेचा आवाज खोल गेला, 'बाळूची पत्नी बोलतेय, आम्ही त्यांना घेऊन मुंबईला जात आहे, त्यांची तब्येत जास्तच खराब होत चाललीयं व ते मला जगायचंय बोलतात

**स्तंभलेखक संजय नलावडे सरांना फोन केला व बाळू उपचारासाठी मुंबईत येतोय सांगितले. बाळू उपचार घेण्यासाठी तयार झाल्याचे ऐकून त्यांनाही खूप आनंद झाला, ते पण तयारीला लागले. गेली महिनाभर बाळूच्या कुटुंबासोबत मदतीला नलावडे सरांनी अंजना राणे मॅडमच्या सहकार्याने खूप धावपळ केली. मोफत सुविधा मिळवून देण्यासाठी जीवाचं रान त्यांनी केले. विविध शारिरीक चाचण्या घेण्यासाठी प्रयत्न केले. राहण्यासाठी व उपचारासाठी धावपळ केली. आव्हानाच्या माध्यमातून जमा करू असे ठरलेच होतं. चाचण्या, रिपोर्ट आल्यानंतर पुढे उपचारांची दिशा ठरणार होती. 'चरश्रळसपरपीं'ीािी मुळे बाळूची स्थिती फारच नाजूक असून आता फार उशीर झालाय,' असे डॉक्टरांनी सांगितले होते. पहा जमले तर येथेच जसा शक्य आहे तसा उपचार घ्या असा सल्ला डॉक्टरांनी दिला होता. त्यांना काय माहित म्हाताऱ्या आई-बापांच हा आधारच येथे आडवा झालायं. कोठून पैसे खर्च करतील या काळजाच्या तुकड्यासाठी? बाळूला सत्य समजलं होतं. बायकोला रडत रडतच तो सांगत होता, 'चला आपला गावच बरा हाय; जे काय व्हायचं ते आता गावाकडच्या दऱ्याखोऱ्यांच्या समक्षच होऊ दे, माळरानावरील मांडवात एक टेन्ट लाऊन दे, तेच माझ्यासाठी सह्याद्रीच्या कुशीतील रूग्णालय असेल.' आज सकाळी नलावडेसरांना फोन केला तेव्हा समजले की बाळूला घेऊन घरचे खिरेश्वरकडे निघालेत. पैसा नाही कसे उपचार घेणार बाळू? न उलगडणारे कोडे आहे. सह्याद्रीची माती किती दिवस या बाळूला आपल्या सोबत ठेवतेयं माहीत नाही? येणाऱ्या काळात म्हातारे आई - बाप कोणता दगड काळजावर ठेऊन या दुःखाला समोर जाणार आहेत?**

**शेवटी बाळू ने घेतला अखेरचा श्वास सह्याद्रीच्या कुशीत. .**

**- रमेश खरमाळे, माजी सैनिक सह्याद्री ट्रेकर..जुन्नर.**